6

७३७/अ.-२
१५/९/१४

अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ नुसार अपंगांसाठी आरक्षणाची गणना करणेबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक, क्रमांक : अपंग-२०१४/प्र.क्र.७५/१६-अ
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८ जुलै, २०१४.

प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय क्र. ७६२२ दि. १२-८-१४

वाचा:- १. केंद्र शासनाचे ऑफिस मेमोरेंडम क्र.३६०३५/३/२००४/Estt(Res), दिनांक २९.१२.२००५.
२. शासन परिपत्रक क्र.अपंग-१००९/प्र.क्र.२७६/०९/१६-अ, दिनांक १९.३.२०१०.
३. केंद्र शासनाचे ऑफिस मेमोरेंडम क्र.३६०१२/२४/२००९/ Estt(Res), दिनांक ३.१२.२०१३.

प्रस्तावना :-

अपंग व्यक्तींची शासन सेवेत नियुक्ती करताना अनुसरावयाची कार्यपध्दती तसेच अपंग कर्मचा-यांना उपलब्ध करुन द्यावयाच्या सोयीसुविधा, उपकरणे इत्यादी संदर्भात केंद्र शासनाच्या कार्यालयीन ज्ञापन (O.M.) दिनांक २९.१२.२००५ अन्वये मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली आहेत. त्यानुसार सर्वांनी कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाच्या सदर दिनांक २९.१२.२००५ च्या कार्यालयीन ज्ञापनाच्या (O.M.) अनुषंगाने शासन पत्र, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक अपंग-२००२/ प्र.क्र.३३१/सुधार-३, दिनांक ७.६.२००६, शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक अपंग-२००७/प्र.क्र.६१/सुधार-३, दिनांक २०.४.२००७, तसेच शासन शुध्दीपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक अपंग-२००७/प्र.क्र.६१/सुधार-३, दिनांक २५.५.२००७ आणि शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक न्याय-२००७/ स.न्या./प्र.क्र.१०३(भाग-३)/१६-अ, दिनांक १९.१०.२००७ आणि शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अपंग-१००९/प्र.क्र.२७६/०९/१६-अ, दिनांक १९.३.२०१० अन्वये वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्यात अपंग व्यक्तींना शासन सेवेत नियुक्तीबाबत व अन्य सोयीसुविधा व उपकरणे उपलब्ध करुन देणेबाबत कार्यपध्दती अनुसरण्यात येत आहे.

दरम्यान, नॅशनल फेडरेशन ऑफ ब्लाईंड व इतर यांनी मा.सर्वोच्च न्यायालय येथे एस.एल.पी.(सिव्हील) क्रमांक ७५४१/२००९ मध्ये दाखल सिव्हील अपील क्रमांक ९०९६/२०१३ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालय यांनी दिनांक ८.१०.२०१३ रोजी न्यायनिर्णय दिला असून त्यानुसार केंद्र शासनाच्या दिनांक २९.१२.२००५ च्या कार्यालयीन ज्ञापनामध्ये (O.M.) आवश्यक ती सुधारणा करण्याचे निर्देशित केले.

ROTA/H/805(1000-8-2014)-

सस/श्रीम पाटील

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयानुसार केंद्र शासनाच्या मानव संशाधन मंत्रालय (DoPT) यांनी दिनांक ३.१२.२०१३ रोजी कार्यालयीन ज्ञापन (O.M.) निर्गमित केले आहे. केंद्र शासनाच्या दिनांक ३.१२.२०१३ च्या सदर कार्यालयीन ज्ञापनाच्या (O.M.) अनुषंगाने राज्यात अपंग व्यक्तींना शासन सेवेत नियुक्तीबाबत व अन्य सोयीसुविधा व उपकरणे उपलब्ध करुन देणेबाबत अनुसरण्यात येत असलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सुधारित सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत:-

शासन परिपत्रक :-

अपंग कर्मचा-यांच्या नियुक्त्यांबाबत केंद्र शासनाने नॅशनल फेडरेशन ऑफ ब्लाईंड व इतर यांचेविरुध्द एस.एल.पी.(सिव्हील) क्र.७५४१/२००९ मध्ये दाखल केलेल्या सिव्हील अपील क्र.९०९६/२०१३ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ८.१०.२०१३ रोजी दिलेल्या आदेशाच्या कार्यान्वयीन भागात दिनांक २९.१२.२००५ च्या केंद्र शासनाच्या कार्यालयीन ज्ञापनामध्ये (O.M.) सुधारणा करुन उचित आदेश निर्गमित करण्याच्या सूचना केंद्र शासनास दिल्या आहेत. त्यानुसार केंद्र शासनाने दिनांक ३.१२.२०१३ अन्वये दिनांक २९.१२.२००५ च्या कार्यालयीन ज्ञापनातील परि.१४ मध्ये आवश्यक सुधारणा सुचविणारे कार्यालयीन ज्ञापन (O.M.) निर्गमित केले आहे.

केंद्र शासनाच्या दिनांक ३.१२.२०१३ च्या कार्यालयीन ज्ञापनाच्या (O.M.) परि.५ अन्वये दिनांक २९.१२.२००५ च्या कार्यालयीन ज्ञापनातील (O.M.) परि.१४ (Para १४) मध्ये सुधारणा करण्यांत आली आहे. सदर परि.५ मधील मजकूर खालील प्रमाणे आहे-

"5. Keeping in view the directions of the Hon'ble Supreme Court, Para 14 of the O.M. dated 29.12.2005 is modified to the following extent:

Reservation for persons with disabilities in Group 'A' or Group 'B' posts shall be computed on the basis of total number of vacancies occurring in direct recruitment quota in all the Group 'A' posts or Group 'B' posts respectively, in the cadre."

राज्य शासन सेवेअंतर्गत अपंग व्यक्तीची पदभरती करताना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर धोरणासोबत केंद्र शासनाच्या दिनांक ३.१२.२०१३ च्या कार्यालयीन ज्ञापनातील (O.M.) उपरोक्त सूचनांचेदेखील कटाक्षाने पालन करण्याची दक्षता घ्यावी.

हे शासन परिपत्रक शासकीय/निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे, नगरपालिका/महानगरपालिका, जिल्हा परिषदा, शासकीय अनुदानप्राप्त संस्था आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार शासनाला आहे अशी इतर सर्व प्राधिकरणे, सेवा व संस्था यांना लागू राहील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१४०७२८१४३७४५९१०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि.रा.डिंगळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई -३२.
सर्व सन्माननीय विधानपरिषद/विधानसभा व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई-४०० ०३५.
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
मा.उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई ४०० ०३२.
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई ४०० ०३२.
सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई- ४०० ०३२.
सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई-४०० ०३२.
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
सरकारी वकील, उच्च न्यायालय, मूळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र-२, नागपूर.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती)
त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन परिपत्रक प्रसिध्द करण्यात यावे.
ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई (१० प्रती),
सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी.
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
राज्यातील सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक.
सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य.
निवड नस्ती/कार्यासन १६-अ.

TRUE COPY
PRINCIPAL
Padmashree Manibhai Desai College
Uruli Kanchan, Dist. Pune

(सोबत " अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ नुसार अपंगांसाठी आरक्षणाची गणना करणेबाबत " या विषयाबाबतच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक : अपंग-२०१४/प्र.क्र.७५/१६-अ ,दिनांक २८.७.२०१४ ची प्रत)

पृष्ठांकन क्रमांक : संकीर्ण-२०१४/ प्र.क्र.४७-२०१४/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक :१७.९.२०१४

3140
29/10/14
30/10/14

प्रति, Reservation cell

मा.प्रधान सचिव (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे स्वीय सहायक,
विभागातील सर्व सहसचिव / उपसचिव,
कुलगुरु,सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
संचालक (उच्च शिक्षण/तंत्रशिक्षण/व्यवसायशिक्षण/व्यवसाय प्रशिक्षण/कला/ग्रंथालय),

(सोबतचे पत्र,माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या / अधिका-यांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात,ही विनंती)

(शीतल रा.कदम)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

(सोबत " अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ नुसार अपंगांसाठी आरक्षणाची गणना करणेबाबत " या विषयाबाबतच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक : अपंग-२०१४/प्र.क्र.७५/१६-अ ,दिनांक २८.७.२०१४ ची प्रत)

पृष्ठांकन क्रमांक : संकीर्ण-२०१४/ प्र.क्र.४७-२०१४/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक :१७.९.२०१४

प्रति,

मा.प्रधान सचिव (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे स्वीय सहायक,
विभागातील सर्व सहसचिव / उपसचिव,
कुलगुरु,सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
संचालक (उच्च शिक्षण/तंत्रशिक्षण/व्यवसायशिक्षण/व्यवसाय प्रशिक्षण/कला/ग्रंथालय),

(सोबतचे पत्र,माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या / अधिका-यांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात,ही विनंती)

(शीतल रा.कदम)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

TRUE COPY
PRINCIPAL
Padmashree Manibhai Desai College
Uruli Kanchan, Dist. Pune

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र. : २५६०११८९/९०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

आरक्षण कक्ष
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
ई-मेल: arakshan_ar@unipune.ac.in

संदर्भ क्र. आरक्षण/ओ-२२/1497 दिनांक : 14-11-14

प्रति,
मा.अध्यक्ष / सचिव,
मा.प्राचार्य / संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.

विषय:- अपंग आरक्षणाबाबत.
संदर्भ:- १. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्रमांक - संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४७-२०१४/आस्था-२, दिनांक १७.०९.२०१४.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक - अपंग-२०१४/प्र.क्र.७५/१६-अ, दिनांक - २८.०७.२०१४

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रास व शासन परिपत्रकास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मा. कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या पत्रासोबत जोडलेल्या सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक - अपंग-२०१४/प्र.क्र.७५/१६-अ, दिनांक २८.०७.२०१४ नुसार पुढील योग्यती कार्यवाही करावी व याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासु,
14/11/14
उपकुलसचिव
(आरक्षण कक्ष)

सोबत:- वरीलप्रमाणे

TRUE COPY
PRINCIPAL
Padmashree Manibhai Desai College
Uruli Kanchan. Dist Pune

1\G:\2014\Circulars.docx

12

अतितात्काळ

महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.११८-१५/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, ४३१ (विस्तार), ४ था मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र.२२७९३०९८
दिनांक : २९.७.२०१५

14525
मवि-१

प्रति,

सहसचिव/उपसचिव,
(व्यवसायशिक्षण / महाविद्यालयीनशिक्षण /विद्यापीठशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

विषय : अपंग विद्यार्थ्यांना सर्व महाविद्यालये, शाळा, वसतिगृह यामधील प्रवेशामध्ये ३% आरक्षणाबाबत निर्देश देण्याची कार्यवाही करणेबाबत...

महोदय / महोदया,

सोबत, मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे क्र. मा.मंत्री (सा. न्या. व वि.स.)/नोट/८१५/२०१५, दिनांक १७.६.२०१५ रोजीच्या पत्राची प्रत जोडली आहे.

सदर पत्रात नमुद केलेल्या मुद्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्याबाबत आपल्या स्तरावरुन निर्देश द्यावेत व याबाबतचा अहवाल आस्था-२ कार्यासनाकडे सादर करावा, ही विनंती.

आपला,

(शीतल रा.कदम)
कक्ष अधिकारी , महाराष्ट्र शासन

सर्व शासकीय म. वि. व शासन अनुदान/ UGC वेतन अनुदानीत बांधलेली महाविद्यालयांना विद्यापीठांना पत्र देऊन करावे. व मंत्रीमहोदयांना प्रत द्यावी.
10/8/15

प्रत उचित कार्यवाहीस्तव :

१) संचालक (उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / व्यवसायशिक्षण व प्रशिक्षण / कला / ग्रंथालय), महाराष्ट्र राज्य.
२) कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
३) उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना कार्यवाहीसाठी अग्रेषित.

C:\Users\shirish\padolya\Documents\क्र.CR_११८_२०१५.docx

सं.क्र.मं ५२/१५/समन्वय मा.मंत्री (सा.न्या. व वि.स.)/ ८३५/१५ 13

VIP/9/अ-२

२२/७/१५ मंत्री

SCANNED

VIP

सामाजिक न्याय आणि
विशेष सहाय्य
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

मंत्री
शालेय शिक्षण क्रीडा आणि युवक कल्याण
उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण
मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य
मंत्रालय, मुंबई ४०००३२

१७.०६.२०१५

अपंग विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा याकरीता शासन कटीबध्द आहे. अपंग व्यक्ती समाजाचे मुख्य प्रवाहात यावा म्हणून अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ अस्तित्वात असून, यामधील तरतुदीनुसार व शिक्षणाचा हक्क या कायद्यातील तरतुदीनुसार अपंग विद्यार्थ्यांना सामान्य शिक्षण प्रक्रियेत सहभागी करुन घेणे अनिवार्य आहे.

याकरीता सर्व महाविद्यालये, शाळा, वसतिगृहे यामधील प्रवेशामध्ये अपंग विद्यार्थ्यांकरीता ३% आरक्षण विहीत आहे. सदर आरक्षणाची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी व सहानुभूतिचा दृष्टीकोन समोर ठेवून अपंग विद्यार्थ्यांचे शारिरीक श्रम कमी व्हावेत, याकरीता सर्व महाविद्यालये, शाळा, यामध्ये अपंग विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा. तसेच ज्या शाळा व महाविद्यालयामध्ये संस्थेची वसतिगृहे आहेत त्या वसतिगृहामध्ये अपंगासाठीचे आरक्षण काटेकोरपणे पाळण्यात यावे. जेणेकरुन अपंग विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयासाठी लांबचा प्रवास टाळता येईल.

तरी याबाबत आपण संबंधितांना आपल्या स्तरावरुन निर्देश देण्याची कार्यवाही व्हावी, ही विनंती.

(राजकुमार बडोले)

मा. ना.श्री. विनोद तावडे
मंत्री,शालेय शिक्षण व उच्च तंत्रशिक्षण

मंत्री, शा.शि., क्री.यु.क., उ.तं.शि., वै.शि., म.भा.,
सा.का. यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
व्ही.आय.पी. टपाल ई ऑफिस क्रमांक :
दिनांक : 9 / 11 2015

14

Director BCUD Office
Savitribai Phule Pune University
In.Dt. 07 SEP 2015
Inward 3535
Outward Date: 08/09/15

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१
Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं. ०२० / २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९. फॅक्स नं.- ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/२०१५/अपंग/मवि-१ / 8771 दिनांक- २४.०८.२०१५
5 SEP 2015

प्रति,
१. कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे
२. विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, सर्व विभाग.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ-४११ ००७
दिनांक- 8-9-15 आवक क्र.- 1269
विभाग-

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक /क्र.आर/ 3852
दिनांक - 07/09/15
जावक दिनांक - 07/09/15
विभाग - BCUD

विषय :- अपंग विद्यार्थ्यांना सर्व महाविद्यालये, शाळा, वसतिगृह यामधील प्रवेशामध्ये ३ % आरक्षणाबाबत निर्देश देण्याची कार्यवाही करणेबाबत.

संदर्भ :- शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१५/ प्र.क्र. ११८-१५/ आस्था-२ , दि.२९.०७.२०१५

उपरोक्त संदर्भिय शासन पत्रात दिलेल्या निर्देशानुसार अपंग व्यक्तींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ अस्तित्वात असून यामधील तरतुदीनुसार अपंग विद्यार्थ्यांना सामान्य शिक्षण प्रक्रियेत सहभागी करून घेणे अनिवार्य आहे.

सर्व शाळा महाविद्यालये , वसतिगृहे यामधील प्रवेशामध्ये अपंग विद्यार्थ्यांकरिता ३ % आरक्षण विहित आहे.सदर आरक्षणाची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी व सहानुभूतीचा दृष्टीकोन समोर ठेवून अपंग विद्यार्थ्यांचे शारिरीक श्रम कमी व्हावेत याकरिता सर्व महाविद्यालये , शाळा यामध्ये त्याचबरोबर वसतिगृहांमध्येही अपंग विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा.

आपल्या अधिपत्याखालील सर्व विद्यापीठे , सर्व शासकीय तसेच अनुदानित महाविद्यालये यांना सदर विषयाबाबत उचित कार्यवाही करण्याकरिता आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे. (संदर्भिय शासन पत्राची प्रत संलग्न) सदर बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

Aso/Satish Prakshale 9/9/15
D.R.(Ass)
A.R.(P.G.)
Chief Recorder 7-9-15

(डॉ.व्ही. आर. मोरे)
सहसंचालक
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य , पुणे- १

प्रत-
१. मा. शिक्षण मंत्री , महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहाय्यक यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

मा.संचालक सविनय
7.9.15

Fr.3Feb15/letter2015-16/Apang

TRUE COPY
PRINCIPAL
Padmashree Manibhai Desai College
Uruli Kanchan, Dist Pune

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र. : ०२० २५६०११८९/९०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

आरक्षण कक्ष
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
ई-मेल: arakshan_ar@unipune.ac.in

संदर्भ क्र.-आरक्षण/ओ-५३/153

दिनांक : 22/08/2019

प्रति,
मा. प्राचार्य/मा.संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था

विषय : अपंग विद्यार्थ्यांना सर्व महाविद्यालये, शाळा, वसतिगृह यामधील प्रवेशामध्ये ३% आरक्षणाबाबत निर्देश देण्याची कार्यवाही करणेबाबत...

संदर्भ : १. शासन पत्र क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.११८ १५/आस्था-२, दि.२९.०७.२०१५
२. उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/२०१५/अपंग/मवि/८७७१, दि.०५.०९.२०१५

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालये, वसतिगृह यामधील प्रवेशामध्ये अपंग विद्यार्थ्यांकरिता ३% आरक्षण विहित असून सदर आरक्षणाची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी व सहानुभूतीचा दृष्टीकोन समोर ठेवून अपंग विद्यार्थ्यांचे शारिरीक श्रम कमी व्हावेत याकरिता आपल्या महाविद्यालयमध्ये त्याचबरोबर वसतिगृहामध्येही अपंग विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा.

कळावे,

आपला,

उपकुलसचिव
(आरक्षण कक्ष)

TRUE COPY
PRINCIPAL
Padmashree Manibhai Desai College
Uruli Kanchan, Dist. Pune

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ: शै.प्रवेश/२४९१

दिनांक : १७/०७/२०१८

तातडीचे/महत्वाचे

प्रति,
मा. विभागप्रमुख/संचालक
सर्व शैक्षणिक विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे–०७

मा. प्राचार्य/संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था

विषय :– अपंग व अनाथ मुलांच्या प्रवेशासाठी लागू असलेल्या आरक्षणाबाबत.

संदर्भ :– आरक्षण कक्ष यांचे पत्र क्र. आरक्षण/ओ–२२/५९० दि. ०३/०५/२०१८.
आरक्षण/ओ–२२/८७९ दि. १२/०७/२०१८.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, शासनाने शासन निर्णय दि. २५/०६/२०१८ अन्वये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अपंग व्यक्ती/विद्यार्थ्यांकरीता ०५ टक्के आरक्षण विहित केलेले आहे.

त्याचप्रमाणे, अनाथ मुलांना शिक्षण व नोकरी यामध्ये शासन निर्णय दि. ०२/०४/२०१८ अन्वये खुल्यां प्रवर्गातुन ०१ टक्का समांतर आरक्षण लागू केलेले आहे. यासंदर्भात उपकुलसचिव, आरक्षण कक्ष यांनी सर्व संबंधिताना उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविलेले आहे. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडत आहे. तरी, अपंग व अनाथासाठी शासनाने विहित केलेल्या आरक्षणानुसार प्रवेशाबाबतची कार्यवाही व्हावी.

कळावे,

आपला,
17/7/2018
उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

TRUE COPY
PRINCIPAL
Padmashree Manibhai Desai College
Uruli Kanchan. Dist Pune